
लोकसत्ता

# लोकमुद्रा

रविवार, १३ एप्रिल २००३

संस्कृती आणि साहित्यविषयक पाक्षिक पुरवणी



पं.मनोहर चिमोटे यांनी नुकतीच वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली. त्यानिमित्ताने...

## मनोगत

दर गुरुवारी घरात भजनं व्हायची, इतकाच स्वरांशी संबंध! याशिवाय वेगळे संगीत संस्कार व्हावेत, अशी त्या वेळची पद्धतच नव्हती. समजायचं वय आलं, तशी एक आंतरिक जाणीव प्रकर्षानं भासू लागली. जाणिवेची जाणीव व्हायलादेखील तसं वय यायला लागतं. सुदैवानं मला माझ्या संगीतप्रेमाची जाणीव लवकरच झाली.

नागपुरात मैफिली ऐकताना सतार, सरोद, गायन, तबला अशा विविध वाद्यांची व संगीताच्या अंगांची मला कल्पना येऊ लागली. मी ती सर्व वाद्यं शिकलो, तरी हार्मोनियमविषयी मनाला कमालीची ओढ लागून राहिल्याची भावना पुन:पुन्हा उफाळून यायची. पूर्वापार चालत आलेल्या हार्मोनियम वादनशैलीपेक्षा वेगळी, गायकीच्या जवळून जाणारी शैली वाजवता येईल का? असंही वाटायचं. नेमकं काय करायचं, ते खूप नंतर कळत गेलं. एक गोष्ट नक्कीच कळली की, ही माझ्या आतल्या मनाची मागणी किंवा गरज आहे. माझ्या या अफाट हार्मोनियम-वेडानं मला घर सोडून जावं लागलं. भीष्मदेव वेदीकडून काहीसं वेगळं वादनतंत्र मला नागपुरात शिकायला मिळालं होतं. जेव्हा मी मुंबईत आलो तेव्हा माझ्या खिशात पुरेसे पैसेही नव्हते, राहायला जागा नव्हती. होतं फक्त माझं निराळं वादनतंत्र व वादनशैली, बस्स इतकंच...!

पुढे खडतर जीवनप्रवास सुरू झाला. मिळेल त्या वाद्यावर रियाज केला. स्वतःचं वाद्य विकत घ्यायलाही त्या वेळी पैसे नव्हते. पण स्वतंत्र वादन-शैलीमुळे माझा चाहता वर्ग निर्माण होऊ लागला. माझ्या रसिकांनी आणि चाहत्यांनी आजपर्यंत मला जिवंत ठेवलंय, शरीरानं आणि मनानंदेखील. जसजशी माझी लोकप्रियता वाढू लागली, तसतशी पूर्वापार वादनशैली सांभाळणाऱ्या काहींनी माझ्यावर टीकादेखील केली. ती तशी होणारच, याची मला पूर्णपणे कल्पना होतीच, पण आपल्या मार्गावरची निष्ठा मी कायम ठेवली. आज जेव्हा माझ्या संवादिनी-शैलीबद्दल गौरवोद्‌गार काढले जातात, तेव्हा जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटतं. कर्तव्य निभावल्यावर होणारं समाधान आज माझ्याजवळ आहे.

हार्मोनियमची संवादिनी करायला मला खूप काही वेगळं करावं लागलं. रिड्स देशी वापराव्या लागल्या. 'की-बोर्ड'मध्ये हाताच्या बोटांच्या दृष्टीनं उपयुक्त असा बदल करावा लागला. सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे ट्युनिंग. अंतरगंधार हा भारतीय संगीताचा आधारभूत संवाद आहे. 'अंतरगंधार' ट्युनिंग या वाद्यावर प्रस्थापित केल्यावर तानपुऱ्याशी या वाद्याचा सुंदर मेळ जमू लागला. स्वरमंडलाच्या तारांची वाद्यावर मांडणी केली व वाद्याचा टोन बदलला. आस, नाद, ठहराव हे आवश्यक घटक मला मिळाले. त्यानंतर गळ्याप्रमाणे खटका, मुरकी, कण, घसीट, गिराव, काही प्रमाणात मिंड या गायनक्रियांचा वादन-शैलीत समावेश केला आणि हळूहळू जादूची कांडी फिरवल्यासारखं वाद्य गाऊ लागलं. त्यावर तासन्‌तास विलंबित गती वाजवता येऊ लागल्या. तंतकारी साधली.

या वाद्याचं संपूर्णपणे पुनरुज्जीवन केल्यावर मला संवादिनी हे नाव सुचलं. ते रसिकांनी उचलूनही धरलं. आता सतार, व्हायोलीन अशा इतर वाद्यांसोबत संवादिनीची जुगलबंदी वाजवताना मला खूप आनंद होतो.

माझ्या या वाटचालीत माझी पत्नी पद्मावती हिचा फारच महत्त्वाचा वाटा आहे. कठीण मार्गावर खडतर तपश्चर्या करताना जी मानसिक उभारी मला आवश्यक होती ती सर्व मला पद्मानं भरभरून दिली, आजही देत आहे.

निसर्ग आपल्याला जन्माला घालतो ते काही उद्दिष्टांसाठीच, तोच आपल्याकडून हे सर्व करून घेत असतो. देवाकडं मी कधीच काही मागत नाही, कारण निसर्गानं मला सर्व दिलंय. फक्त आपण मेहनत करीत राहायला हवं.

संवादिनी हाच माझा मोक्ष आहे, असं मी मानतो. मला जीवनाकडे प्रवृत्तिमय दृष्टीनं पाहावंसं वाटतं, निवृत्तिमय नव्हे. रसिकांवर मी मना-पासून प्रेम करतो. माझे सर्व शिष्य मनापासून मेहनत करतात. मी त्यांच्या-वर कधीच रागवू शकत नाही. शिष्याला सोपं करून कळेपर्यंत शिकवणं, हे मी माझं कर्तव्य मानतो. शिष्यांनी प्रामाणिक असावं, इतकीच माझी अपेक्षा असते.

माझ्या प्रवाहात अनेक संधी चालून आल्या. मला हिंदी चित्रपटात संगीत देण्यासाठी ऑफर्स आल्या होत्या. पण संवादिनीचा ध्यास इतका मोठा होता की, मला ते प्रलोभन वाटलं व मी त्या नाकारल्या. मला निश्चित माहीत आहे की, माझा जन्म फक्त संवादिनीसाठीच आहे. मी साथसंगतही सोडली, कारण साथसंगतीनं वाद्य कधीच मोठं होत नाही. ते स्वतंत्र वादनानेच मोठं होतं, श्रीमंत होतं. त्यासाठी भरपूर चिंतन आवश्यक असतं.

अजूनही मी लढतो आहे. आकाशवाणीवरील हार्मोनियम सोलोवरील बंदी उठवण्यास मला कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागला. संवादिनीचं स्वतंत्र वादन नावाजलेल्या संगीत- संमेलनांमध्ये सातत्यानं होत राहावं, यासाठी मला सहकार्याची अपेक्षा आहे. सरकारी पातळीवरून, प्रसारमाध्यमां-तून मी सातत्यानं याचा पुनरुच्चार करीत असतो.

मी आशावादी आहे. जर हार्मोनियमसारखं वाद्य संवादिनी होऊन गाऊ शकतं, तर ते जगभर भारतीय संगीताचा मान राखू शकतं आणि हे नक्कीच होणार, निसर्गच करून घेणार. संवादिनी आणि मी यांच्यातील अद्वैताची अनुभूती मला कित्येकदा प्रकर्षानं होते. दुसऱ्यांना आनंद द्यायचा हे व्रत मी कायमचं स्वीकारलंय.

**मनोहर चिमोटे**